| CNR No.MHKO200000822019 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | – | ०५ | ०३ | २०१९ |
| | नोंदणी तारीख | – | ०५ | ०३ | २०१९ |
| | निकाल तारीख | – | १२ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस. |
| | | | ०७ | ०२ | ०७ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात (पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक १४/२०१९.**
**न्यायनिर्णय निशाणी क्रमांक १०९/ ब.**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक– १२ मे २०२६**

कळे पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रं.१५६/२०१८ भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,१४८,३२४,५०४ सह कलम १४९ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत कळे पोलीस ठाणे,<br>ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. श्री. पी.एच.सावंत |
| आरोपी | १. | संजय बापु गुरव, व.व.४८, |
| | २. | सुरेश बापु गुरव, व.व.३७, |
| | ३. | बापु कृष्णा गुरव, व.व.७४, |
| | ४. | पांडुरंग कृष्णा गुरव, व.व.७९, |
| | ५. | वसंत बळवंत गुरव, व.व.३४, |
| | ६. | बळवंत कृष्णा गुरव, व.व.६९, |
| | ७. | उत्तम धोंडीराम गुरव, व.व.३८, |
| | ८. | हिराबाई बापु गुरव, **(मयत)** |
| | ९. | संगिता संजय गुरव, व.व.४२, |
| | | सर्व रा. पाटपन्हाळा, ता. पन्हाळा,<br>जि. कोल्हापूर |
| आरोपीतर्फे वकील | | ॲड. श्री. व्ही.एस. पाटील |

**भाग–ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २८.१२.२०१८ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ३१.१२.२०१८ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ०५.०३.२०१९ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | २३.०१.२०२० |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १३.०७.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | – |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायेजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संजय बापू गुरव, | फौ.प्र.सं. कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस | ०५.०३.२०१९ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०४ सह कलम १४९ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | - | - |
| २. | सुरेश बापु गुरव, | | ०५.०३.२०१९ | | निर्दोष मुक्तता | - | - |
| ३. | बापु कृष्णा गुरव, | | ०५.०३.२०१९ | | निर्दोष मुक्तता | - | - |
| ४. | पांडूरंग कृष्णा गुरव, | | ०५.०३.२०१९ | | निर्दोष मुक्तता | - | - |
| ५. | वसंत बळवंत गुरव, | | ०५.०३.२०१९ | | निर्दोष मुक्तता | - | - |
| ६. | बळवंत कृष्णा गुरव, | | ०५.०३.२०१९ | | निर्दोष मुक्तता | - | - |
| ७. | उत्तम धोंडीराम गुरव, | | ०५.०३.२०१९ | | निर्दोष मुक्तता | - | - |
| ८. | हिराबाई बापु गुरव, **(मयत)** | | ०५.०३.२०१९ | | निर्दोष मुक्तता | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. | संगिता संजय गुरव, | | ०५.०३. २०१९ | | निर्दोष मुक्तता | - | - |

**भाग–क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | बाबासो प्रभाकर साळोखे | फिर्यादी | ४९ |
| २. | नाथा भाऊ वाळवेकर | घटनास्थळ पंच | ५१ |
| ३. | अमोल आनंदा तेली | साक्षीदार | ८३ |
| ४. | विमल कृष्णात पाटील | साक्षीदार | ८४ |
| ५. | दत्तात्रय भाऊ वाळवेकर | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ८५ |
| ६. | अमित वसंत पाटील | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ८६ |
| ७. | डॉ. मनाली माने | वैद्यकीय अधिकारी | ८८ |
| ८. | सर्जेराव ज्ञानु पाटील | तपासी अंमलदार | ९३ |

**ब–बचावपक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

**क. न्यायालयामार्फत**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ५० | फिर्याद |
| २. | आर्टीकल अ | घटनास्थळावरील दोन फोटो |
| ३. | ५२ | घटनास्थळ पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| ४. | ८९ | जखमी बाबासो प्रभाकर साळुंखे यांचे एम.एल.सी. वैदयकीय प्रमाणपत्र |
| ५. | ९० | जखमी विदया दिलीप गुरव यांचे एम.एल.सी. वैदयकीय प्रमाणपत्र |
| ६. | ९१ | जखमी सखुबाई शंकर गुरव यांचे एम.एल.सी. वैदयकीय प्रमाणपत्र |
| ७. | ९२ | जखमी आक्काताई प्रभाकर साळुंखे यांचे एम.एल.सी. वैदयकीय प्रमाणपत्र |
| ८. | ९४ | तपासाचा लेखी आदेश |
| ९. | ९५ | आरोपींना दिलेली फौ.प्र.सं.कलम ४१अ ची नोटीस |
| १०. | ९६ ते ९९ | साक्षीदार क्रं.३ अमोल तेली, क्र.४ विमल पाटील, क्र.५ दत्तात्रय वाळवेकर, क्र.६ अमित पाटील यांचे जबाबातील अधोरेखांकित भाग अ |
| ११. | १०० | जप्ती पंचनामा |
| १२. | १०१ | गुन्हयास वाढीव कलम लावलेबाबतचा अहवाल |

**ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | २२ | दोषारोप |
| ३. | २३ ते ३१ | आरोपींचे निवेदन |
| ४. | १०२ ते १०८ | आरोपी क्रं.१ ते ७ व ९ यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन |

**ड. भौतिक वस्तु**

| **अ.क्रं.** | **मुद्देमाल अर्टीकल नं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | -- | एक बांबूची काठी तिस चार गाठी चार पेरे असलेली |

| | | |
|---|---|---|
| २. | -- | एक बांबूची काठी तिस चार गाठी तीन पेरे असलेली |
| ३. | -- | एक बांबुची काठी तिस पाच गाठी पाच पेरे असलेली |
| ४. | -- | एक बांबुची काठी तिस चार गाठी व चार पेरे असलेली |
| ५. | -- | एक बांबुची काठी तिस तीन गाठी व तीन पेरे असलेली |
| ६. | -- | एक बांबुची काठी तिस तीन गाठी व तीन पेरे असलेली |
| ७. | -- | एक बांबुची काठी तिस चार गाठी पाच पेरे असलेली |
| ८. | -- | एक लाकडी रिप, ८७ सेंमी. लांबीची व ५ सें.मी. रुंदी असलेली |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक १२ मे २०२६ रोजी घोषित)

आरोपी क्रं.१ ते ९ यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,१४८,३२४,५०४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केल्याची चौकशी झालेली आहे.

**०२.** अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, दि.२८/१२/२०१८ रोजी सकाळी ०८.३० वाजता अगर त्या सुमारास पाटपन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापुर या गावी फिर्यादी यांचे जमीन गट नं.४८५ या घळण नावाच्या शेतामध्ये फिर्याद यांची आई, मावशी, बहीण अशा जमीन गट नं.४८५ मध्ये शेतात खत टाकत असताना आरोपी यांनी संगनमताने एक जमाव करुन फिर्यादी यांचे वरील गट नंबर शेतातील पावसाचे  पाणी जाणेकरीता घातलेला सिमेंटचा नळा का घातला असे म्हणुन त्यांचेशी वादावादी करुन फिर्यादी यांची आई अक्काताई ही आडवी गेली असता तिला आरोपी क्र.१ व २ यांनी आपले हातातील काठीने डोक्यावर मारुन जखमी केले. त्यावेळी ती जमीनीवर पडली असता आरोपी नं.९ हिने लाथाबुक्कयांनी मारहाण केली व इतर आरोपींनी फिर्यादीची बहीण व मावशी यांना आपले हातातील काठीने हातावर, अंगावर मारुन जखमी केले. आरोपी क्रं.३ व ७ यांनी फिर्यादीची बहीण विदया हिस सर्व अंगावर काठीने मारहाण केली. तसेच मावशी सखुबाई हिस आरोपी क्रं.४ व ८ यांनी

आपले हातातील काठीने मारहाण केली म्हणुन फिर्यादी यांनी आरोपींना त्याची आई, बहीण व मावशी यांना का मारहाण केली ? अशी विचारणा केली असता फिर्यादीस आरोपींनी वाईट वंगाळ शिवीगाळ करुन तुझ्या शेतातील नळा काढुन टाकणार असे म्हणुन आरोपी क्रं.५ व ६ यांनी त्यांचे हातातील काठीने फिर्यादीचे डोक्यात, डाव्या हातावर, पाठीवर, दोन्ही पायावर मारहाण करुन जखमी केले. त्यावेळी फिर्यादी व जखमींनी आरडाओरडा केला असता शेजारील शेतात काम करीत असणारे लोक कृष्णात रामचंद्र पाटील, बाळकृष्ण रामचंद्र पाटील व इतर लोक येवुन भांडणाची सोडवा सोडव केली. त्यानंतर त्यांचे गावातील अमित तेली याने त्यांचे खाजगी वाहनाने जखमींना उपचाराकरिता सी.पी.आर. हॉस्पीटल, कोल्हापूर येथे दाखल केले.

**०३.** फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपींविरुध्द कळे पोलीस ठाणे गु.र.क्र.१५६/२०१ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,१४८,३२४,३२३,५०४ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद झाला. सदर गुन्हयाचा तपास सहाय्यक फौजदार एस.डी. पाटील यांनी केला असुन त्यांनी तपासा दरम्यान घटनास्थळ पंचनामा केला, हत्यार जप्तीचा पंचनामा केला, मुद्देमाल पोलीस ठाणेत जमा केला, साक्षीदारांचे तपास टिपण्णे नोंदवली, जखमींची वैदयकीय प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे प्राप्त करुन कामात सामील केली व केलेल्या तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले आहे.

**०४.** माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.२२ नुसार भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,१४८,३२४,५०४ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवला. आरोपींना दोषारोप मराठीत वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविल्याने तसे त्यांचे निवेदन नि.क्र.२३ ते ३१ वर नोंदविण्यात आले.

**०५.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता एकुण आठ साक्षीदारांचा साक्षीपुरावा तपासला असुन अभियोगपक्षाने काही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. पुरेशी संधी दिलेनंतर नि.क्र.१ कडील दि.०६/०४/२०२६ रोजीचे आदेशाने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करणेत आला. दरम्यानचे कालावधीमध्ये आरोपी क्रं.८ हिराबाई बापु गुरव या मयत असल्याचा मृत्यू दाखला नि.क्र.३६ अभिलेखावर आलेने त्यांचे विरुध्दचा खटला नि.क्र.१ कडील दि.१६.१२.२०२१ चे आदेशाने अवसान पावला. तद्नंतर आरोपी क्र.१ ते ७ व ९ चे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्र.१०२ ते १०९ कडे नोंदवले असता आरोपींनी खोटी केस केल्याचा बचाव घेतला परंतु, आपल्या बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत–

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दि.२८/१२/२०१८ रोजी सकाळी ०८.३० वाजताचे सुमारास पाटपन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील गट नं.४८५ मध्ये आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा की ज्याचा सामाईक उद्देश फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण किंवा हल्ला करणेचा उद्देश असलेल्या जमावाचा घटक होते व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम १४३ सह कलम १४९ अन्वये अपराध केला? | नकारार्थी. |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दीष्ट साधण्यासाठी बलप्रयोग किंवा हिंसाचार | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | करुन दंगल करुन फिर्यादी व साक्षीदार यांचेवर हल्ला करुन मारहाण केली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम १४७ सह कलम १४९ अन्वये अपराध केला ? | |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दीष्ट साधण्यासाठी गुन्हयात वापरलेस मृत्यू होईल अशा प्राणघातक काठीने सज्ज होऊन फिर्यादी व साक्षीदार यांचेवर हल्ला करुन बलप्रयोग किंवा हिंसाचार करुन दंगा केला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम १४८ सह कलम १४९ अन्वये अपराध केला ? | नकारार्थी. |
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दीष्ट साधण्यासाठी हत्यार म्हणुन वापरलेस मृत्यू होईल अशा काठीने फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये अपराध केला? | नकारार्थी. |
| ५. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन त्यांचा उद्वेशपुर्वक अपमान करुन त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे प्रक्षोभीत केले व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ६. | आदेश काय ? | आरोपी क्रं.१ ते ७ व ९ यांची निर्दोषमुक्तता करणेत |

| | | |
|---|---|---|
| | | येते व आरोपी क्रं.८ विरुध्दचा खटला त्या मयत झाल्याने अवसान पावला आहे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>प्रश्नबिंदू क्र.१ ते ५ करीताः</u>**

**०७.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ५ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधित आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंचे विश्लेषण एकत्रित केले आहे. अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपीचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०८.** प्रस्तुत प्रकरणातील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाचे मुख्य साक्षीदार क्र.१ बाबासो प्रभाकर साळोखे **(फिर्यादी/नि.क्र.४९)** यांनी त्यांचे मौखीक पुराव्यात असे कथन केले आहे की, आरोपी हे त्यांच्या भावकीतील आहेत. त्यांचा मावस भाऊ दत्तात्रय गुरव यांना त्यांनी व त्यांच्या आजीने दत्तक दिलेले आहे. त्यांचा मावस भाऊ दत्तात्रय गुरव हे निम्म्या वतनावर तर सदर साक्षीदार हे निम्म्या वतनावर राहतात. आरोपी व दत्तात्रय गुरव हे पाटपन्हाळा येथे राहतात. त्यांच्या आजीचे नाव रखमाबाई राघू गुरव असून त्यांनी वतनावर करीत असलेल्या शेताची बहिरीचा मळा, रिंगळी, घळण, खाटकी, वडाचा मळा अशी त्यांची नावे आहेत. दि.२८.१२.२०१८ रोजी पहाटे ५ वाजता बहिरीचा मळा याठिकाणी ते पाणी देण्यासाठी गेले होते. घळण नावाच्या शेतात त्यांची आई, मावशी व बहिण खत विस्कटण्यासाठी जाणार होत्या. त्यांचा मावस भाऊ दत्तात्रय गुरव व रघुनाथ गुरव हे पहाटे ४ वाजता ट्रक घेवून आर.टी.ओ. ऑफीसला गेले होते. घळण या शेताचे सपाटीकरण करून पावसाचे पाणी

जाण्यासाठी स्वतः नळा टाकला. गट नं.५०३ मध्ये सदरचा नळा सोडला. सदरची जमीन ही रघुनाथ गुरव यांची आहे. सकाळी ७–७.३० च्या सुमारास ते पाण्यावर असताना त्यांना मोठमोठयाने ओरडण्याचा व भांडणाचा आवाज आला. सदरचा आवाज घळण नावाच्या शेतातून आला. सदरचा आवाज कोणाचा आहे हे पहाण्याकरीता ते घळण नावाच्या शेतात गेले. त्याठिकाणी त्यांची आई,मावशी व बहिण यांना तुम्ही संजय गुरव, सुरेश गुरव, बापू गुरव, उत्तम गुरव, बळवंत गुरव, वसंत गुरव, पांडू गुरव, हिराबाई गुरव व संगिता गुरव यांनी काठीने मारहाण केली व वाद करू लागले. त्यानंतर ते त्यांना वाद घालू नका. त्यांचा भाऊ येवू देत. आपण नळा काढू असे म्हणटल्यावर आरोपींनी काही ऐकले नाही व सदरचा नळा उपसून काढून टाकला. आरोपी संजय बापू गुरव व सुरेश गुरव यांनी त्यांच्या आईच्या डोक्यात काठीने मारहाण केली. त्यांची आई सदर मारहाणीमुळे खाली पडल्यानंतर आरोपी हिराबाई गुरव यांनी त्यांना लाथा बुक्क्यांनी मारले. त्यांची बहिण विद्या गुरव हिला उत्तम गुरव, पांडू गुरव यांनी काठीने मारहाण केली. त्यांची मावशी सखुबाई शंकर गुरव हिला आरोपी बापू गुरव, बळवंत वसंत गुरव यांनी काठीने मारहाण केली. त्यांनी सदर भांडणाची सोडवासोडव केली व पुढे जात असताना बापू कृष्णा गुरव, वसंत गुरव, बळवंत गुरव, संजय गुरव यांनी पाठीमागून त्यांच्या डोक्यात पाठीवर व पायावर काठीने मारहाण केली. त्यानंतर त्यांनी आरडाओरडा केला असता शेजारच्या शेतात हजर असलेले उस कामगार दत्तात्रय वाळवेकर, संभाजी कांबळे, राजाराम कांबळे, नाथा वाळवेकर यांनी त्यांची आरोपींच्या तावडीतून सुटका केली. त्यानंतर त्यांनी अमोल तेली यांची गाडी बोलवून त्यांना उपचाराकरीता सी.पी.आर. हॉस्पीटल, कोल्हापूर याठिकाणी नेले. त्यांनी सी.पी.आर. मध्ये उपचार घेत असताना लक्ष्मीपुरी पोलीसांना नि. ५० वरील फिर्याद दिली. ज्या काठीने त्यांना मारहाण झाली. त्या काठया त्यांना दाखवल्या. परंतु त्या काठया त्या नसल्याच्या त्यांनी सांगितले.

**०९.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ नाथा भाऊ वाळवेकर **(घटनास्थळ पंच/नि.क्र.५१)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, घळण नावाच्या शेताच्या आजूबाजूला त्यांचे शेत नसून ते एक उस तोड कामगार आहेत. घळण नावाच्या शेताच्या गट नं. ४८५ असा आहे. त्यांनी सदर गटाचा ७/१२ उतारा तसेच गाव/गट नकाशा पाहिला नाही. घटनास्थळावर जाण्यापूर्वी घटनास्थळाचा गट नं. ४८५ हाच आहे हे पाहण्याकरीता त्यांनी ७/१२ तसेच गाव/गट नकाशा पाहिला नाही. उर्वरीत प्रश्नांना नाकबुल उत्तरे नोंदविली.

**१०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ अमोल आनंदा तेली (साक्षीदार/नि.क्र.८३) यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, सन २०१९ पासुन त्याच्याकडे तवेरा एम.एच.११वाय.६८०० ही गाडी आहे. सदरची गाडी तो भाडेने वापरायला देतो. दि.२८/१२/२०१८ रोजी सकाळी ८.३० चे सुमारास तो घरी असताना त्यावेळी त्याला अदित्यचा फोन आला व त्याचे घरी किरकोळ काय झाले तुम्ही या. त्यानुसार तो रेंगडी नावाच्या शेतात गेले. आदित्यची आत्या विदया गुरव, बाबासो गुरव, सखुबाई गुरव,आक्काताई साळोखे यांना मारहाण झालेने त्याने त्यांना उपचाराकरीता सी.पी.आर. हॉस्पीटल कोल्हापूर येथे नेले. दुपारी ४ चे सुमारास त्याने त्यांना घेवुन आला. त्यानंतर दुस-या वेळी कोणाच्या भांडणे झाली हे त्याला माहित नाही. त्यानंतर त्याने रघुनाथ गुरव, दत्तात्रय गुरव, संभाजी गुरव यांना घेवुन त्याने सी.पी.आर. हॉस्पीटलला गेले. घटनेविषयी त्याला माहिती नाही. साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्याने त्याची साक्ष या कामी निरुपयोगी ठरली आहे.

**११.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ विमल कृष्णात पाटील (साक्षीदार/नि.क्र.८४) यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, त्या सर्व आरोपींना तसेच दत्तात्रय गुरव व संजय गुरव यांना ओळखतात कारण ते त्यांच्या गावातील राहणारे आहेत. दि.२८/१२/२०१८ रोजी त्यांनी रात्री ८.३० च्या

सुमारास त्यांच्या घरी असताना त्यांना दंग्याचा आवाज आल्यावर ते काय झाले हे पाहणेसाठी गेले. त्या ठिकाणी दत्तात्रय गुरव, रघुनाथ गुरव व संभाजी गुरव यांना जखम झाली होती व रक्त येत होते. त्या तिघांना मारहाण झाली होती. सदर भांडणाचा प्रकार त्याने स्वत: पाहिलेला नाही. फक्त त्याने त्यांना दवाखान्यात घेवुन जात असताना पाहिले. सदर साक्षीदारानेही अभियोगपक्षास सहाय्य केलेले नसल्यामुळे त्यांची साक्ष निरुपयोगी ठरली आहे.

**१२.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.५ दत्तात्रय भाऊ वाळवेकर **(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/नि.क्र.८५)** व साक्षीदार क्रं.६ अमित वसंत पाटील **(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/नि.क्र.८६)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, सन २०१९ साली ते ऊस तोडणी कामगार म्हणुन काम करत होते. ते दत्तात्रय गुरव यांचे ट्रकवर काम करत होता. दि.२८/१२/२०१८ रोजी राजाराम केरबा कांबळे यांचे शेतातील ऊस तोडणीचे काम चालले होत. ते सकाळी ७.३० चे सुमारास शेतात गेले. सकाळी८.३० च्या सुमारास खालच्या शेतातुन आवाज ऐकु आला. त्यावरु ते ज्या ठिकाणाहुन आवाज आला त्या ठिकाणी पोहोचले. त्या ठिकाणी त्यांनी जावुन भांडणाची सोडवासोडव केली. सदर शेतात दत्तात्रय गुरव व संजय गुरव यांची भांडणे लागली होती. त्यांनी त्या ठिकाणी केवळ भांडणे सोडवण्याची काम केले आहे. ते आरोपींना ओळखतात कारण ते त्यांच्याच गाववाले आहेत.

**१३.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.७ डॉ. मनाजी माने **(वैद्यकीय अधिकारी/नि.क्र.८८)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की,दि.२८.१२.२०१८ रोजी सकाळी १०.५५ च्या सुमारास त्यांनी बाबासो प्रभाकर साळोखे यांना एम.एल.सी. नं.१६६००/२०१८ अन्वये तपासले. त्यांना त्यांच्या दोन्हा पायाला, दोन्हा खांदयाना अनेक प्रकारच्या जखमा झाल्या होत्या. त्यानुसार त्यांनी नि.८९ अन्वये त्यांची एम.एल.सी. देवू केली. त्याचदिवशी त्यांनी जखमी विद्या

दिलीप गुरव यांना एम.एल.सी. नं.१६६०१/२०१८ अन्वये तपासले. त्यांना डोक्याला व इतर अवयवांना देखील मार लागला होता. त्यानुसार त्यांनी नि.९० अन्वये त्यांची एम.एल.सी. देवू केले. त्यादिवशी त्यांनी सखुबाई शंकर गुरव एम.एल.सी. १६६०२/२०१८ अन्वये त्यांना तपासले. त्यांना मांडीवर, उजव्या हाताच्या अंगठयाला जखमा झाल्या होत्या. त्यानुसार त्यांनी नि.५१ अन्वये त्यांची एम.एल.सी. देवू केली. त्याचदिवशी त्यांनी जखमी आक्काताई प्रभाकर साळोखे यांना एम.एल.सी. नं.१६५९९/२०१८ अन्वये तपासले. त्यांना देखील शरीरावर ब–याच ठिकाणी जखमा झाल्या होत्या. त्यानुसार त्यांनी नि.९२ अन्वये एम.एल.सी. देवू केले.

**१४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.८ सर्जेराव ज्ञानु पाटील **(तपासी अंमलदार/नि.क्र.९३)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, गु.र.नं. १५६/२०१८ चा तपास त्यांना ठाणे अंमलदार घाडगे यांच्या नि. ९४ वरील लेखी आदेशान्वये प्राप्त झाला. लेखी आदेशासोबत त्यांनी फिर्याद, दवाखाना वर्दी, छापील प्रथम खबरी अहवाल त्यांना प्राप्त झाले होते. त्यानंतर त्यांनी दि.०१.०१.२०१९ रोजी पुरवणी जबाब नोंदविला व घटनास्थळाच्या जमीनीचा ७/१२ उतारा इ. कागदपत्रे जमा करून घेतली. दि.०१.०१.२०१९ रोजी त्यांनी नि.५२ वरील घटनास्थळाचा पंचनामा नोंदविला. घटनास्थळ हे पाटपन्हाळा या गावी घळण नावाच्या शेतातील असून सदरचे ठिकाण त्यांना फिर्यादीने दाखवले. त्यांनतर त्यांनी दि.०१.१.२०१९ रोजी सदर गुन्हयाचे अनुषंगाने साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१ अ ची नोटीसदिली. ती नि.९५ वर दाखल आहे. त्यांनी साक्षीदार क्रं. ३ अमोल तेली साक्षीदार क्रं.४ विमल पाटील, साक्षीदार क्रं.५ दत्तात्रय वाळवेकर, साक्षीदार क्रं.६ अमित पाटील यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ त्यांच्या सांगण्या प्रमाणे नोंदवून घेतला होता. दि.०३.०१.२०१९ रोजी आरोपीने हजर केलेली व गुन्हयात वापरलेली हत्यारे नि. १०० वरील जप्ती पंचनाम्याद्वारे जप्त करून घेतले. जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करून प्रस्तुत कामात सामील केले. सदर

गुन्हयास वाढीव कलम ३२३, ५०६ लावण्याबाबतचा अहवाल नि.१०१ अन्व्ये दाखल असून तपासाअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपींविरूध्द न्यायालयात दोषारोपत्र पाठवले.

**१५.** अशा प्रकारे उपरोक्त प्रमाणे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा सरतपास पटलावर आला असताना सदर साक्षीदारांच्या एकूणच मौखिक पुराव्याचे मूल्यमापन करण्याकरीता त्यांचा सरतपास हा उलटतपासामध्ये देखील अबाधित राहिला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे साक्षीदारांचा उलटतपास पुढीलप्रमाणे –

**१६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ बाबासो प्रभाकर साळोखे (फिर्यादी/नि.क्र.४९) यांनी उलटतपसामध्ये असे मान्य केले आहे की, दत्तात्रय गुरव हे त्यांचे मावस भाऊ आहेत. नाथा वाळवेकर व रजनीकांत पाटील हे देखील त्यांचे जवळचे नातेवाईक आहेत. आक्काताई साळोखे ही त्यांची आई असून विदया गुरव ही मावस बहीण आहे. तर सखुबाई शंकर गुरव ही त्यांची मावशी आहे. गजानन साळोखे हा त्यांचा सख्खा लहान भाउ आहे. आदित्य गुरव हा त्यांचा मावस भाउ, दत्तात्रय गुरव यांचा मुलगा आहे. रघुनाथ गुरव हे देखील त्यांचे मावस भाउ आहेत. पाटपन्हाळा गावी त्यांच्या व दत्तात्रय गुरव यांच्या मिळकती वेगवेगळया आहेत. गुरव व साळोखे यांचा कोणताही जवळचा संबंध नसून त्यांची एकत्र शेती देखील नाही. आरोपींच्या घळण नावाच्या शेताच्या आजूबाजूला इतर मिळकती आहेत. गट नं. ४८५ चे सपाटीकरण केल्यानंतर दत्तात्रय गुरव यांनी पुर्वापार असलेला नाल्याचा प्रवाह बदलला होता. पन्हाळा पोलीस स्टेशन अंतर्गत गु.र.न. १०/१७ हा मारहाणीचा व जातीवाचक शिवीगाळ केल्याचा गुन्हा नोंद आहे. सदरचे प्रकरण मा. अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश कोल्हापूर यांच्या न्यायालयात सेशन केस क्रं. ४४/२०१७ अन्वये त्यांच्याविरूध्द प्रलंबित आहे. उर्वरीत प्रश्नांना नाकबुल उत्तरे नोंदविली.

**१७.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ नाथा भाऊ वाळवेकर (घटनास्थळ पंच/नि.क्र.५१) यांनी उलटतपसामध्ये असे मान्य केले आहे की, त्याचे शिक्षण इयत्ता १२वी पर्यंत झालेले आहे. तो प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी व आरोपींना ओळखतो कारण ते देखील पाटपन्हाळा येथे राहणारे आहेत. घळण नावाच्या शेताच्या आजुबाजुला त्याचे शेत नसुन तो एक ऊस तोड कामगार आहे. तो ऊस तोड कामगार म्हणुन दत्तात्रय गुरव यांचेकडे काम करतो. दत्तात्रय गुरव हे फिर्यादी बाबासो साळोखे यांचे मावस भाऊ आहेत. घळण नावाच्या शेताचा गट नं.४८५ असा आहे. सदर गटाचा ७/१२ उतारा तसेच गाव/गट नकाशा पाहिला नाही. त्याने घटनास्थळावर जाण्यापुर्वी घटनास्थळाचा गट नं.४८५ हाच आहे हे पाहण्याकरिता ७/१२ तसेच गाव/गट नकाशा पाहिला नाही. घटनास्थळाचा चतु:सिमा त्याला बाबासाहेब साळोखे यांनी सांगितल्या आहेत. वर नमुद घटनास्थळाच्या चतु:सिमा त्याचा असल्याबाबतची त्याने व्यक्तीश: खात्री केली होती. त्याने खात्री करणेसाठी ७/१२ उतारा पाहिला होता. घटनास्थळावर पडलेल्या काचेच्या फुटलेल्या बांगडया व केस पोलीसांनी जप्त केल्या नाहीत. घटनास्थळ पंचनामा करणेकामी वर नमुद दिवशी तो फिर्यादी सोबत घटनास्थळावर गेला. तो स्वत: घडयाळ वापरतो. त्याला फिर्यादी बाबासोने घटनास्थळावर बोलवण्यापुर्वी त्या ठिकाणी तपासी अंमलदार घटनास्थळावर हरज होते. आर्टीकल अ वर दाखल असलेले फोटो भालचंद्र पोतदार यांनी कॅमे–यावर काढलेले आहेत.

**१८.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ विमल कृष्णात पाटील (साक्षीदार/८४) यांनी उलटतपसामध्ये असे मान्य केले आहे की, बाबासो साळोखे व त्यांचे घर जवळजवळ आहे. जखमींना कोणी मारले, ते कशामुळे जखमी झाले याविषयी त्यांना व्यक्तीश: माहिती नाही.

**१९.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.५ दत्तात्रय भाऊ वाळवेकर (प्रत्यक्षदर्शी

साक्षीदार/नि.क्र.८५) व साक्षीदार क्रं. ६ अमित वसंत पाटील (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/नि.क्र.८६) यांनी त्यांच्या उलटपासामध्ये असे कबुल केले आहे की, त्यांचे व दत्तात्रय गुरव यांचे संबंध चांगले आहेत. रेवटा याठिकाणी राजाराम कांबळे यांची शेतजमीन नाही. त्यांच्या दोघांच्या समक्ष कोणी कोणाला मारहाण केली नाही. पोलीसांनी त्यांचा जबाब पोलीस स्टेशनमध्ये नोंदवून घेतला. पोलीसांनी त्यांच्या जबाबात काय लिहून घेतले याविषयी त्यांना माहित नाही. तसेच दत्तात्रय गुरव व संजय गुरव यांच्यात कोणत्या कारणामुळे भांडणे झाली याविषयी देखील त्यांना माहिती नाही.

**२०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं. ७ डॉ. मनाली माने (वैद्यकीय अधिकारी/नि.क्र.८८) यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, त्यांच्या हॉस्पीटलला जनरल रजिस्टर अदयावत असते. त्यावर नोंदणी क्रमांक, केस पेपर व मेडिकल सर्टिफिकेट या सर्व बाबींची नोंद असते. सदर कामी साक्षीला येताना त्यांनी वर नमूद रजिस्टर सोबत आणले नाही. एम.एल.सी. रिपोर्टवरून सदर जखमी हे पोलीस यादीसह आले होते ही बाब त्यांनी एम.एल.सी. मध्ये नमूद केलेली नाही. पोलीसांच्या विनंतीवरून त्यांनी सदरचे वैद्यकीय प्रमाणपत्र दिलेले आहे.

२१. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.८ सर्जेराव ज्ञानू पाटील (तपासी अंमलदार/नि.क्र.९३) यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, त्यांना दिलेल्या लेखी आदेशावर आवक जावक क्रमांक नमूद नाही. लेखी आदेशासोबत प्राप्त झालेल्या कागदपत्रांचे त्यांनी अवलोकन केले होते. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल त्यांनी आरोपीकडून जमा करून घेतलेला आहे. जखमीच्या रक्ताचे नमुने त्यांनी घेतले नाहीत किंवा तपासणी कामी तसा सी.ए. रिपोर्ट दाखल केलेला नाही. त्यांनी बाबासो साळोखे, विदया गुरव, सखुबाई गुरव, आक्काताई साळोखे यासारखे प्रत्यक्षदर्शी अशा साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. दि. २८.१२.२०१८ रोजी सी.पी.आर. हॉस्पीटल कोल्हापूर येथे उपचार घेतल्याबाबत कोणताही कागद प्रस्तुत

कामामध्ये दाखल केलेला नाही.

२२. एकंदरीत अभिलेखावरील अभियोगपक्षाच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादी व आरोपी यांच्यात शेतजमीनीच्या कारणावरून पूर्वीपासून वाद आहेत. आरोपीच्या घळण नावाच्या शेतीच्या आजूबाजूला त्यांची शेती आहे. गट नं. ४८५ चे सपाटीकरण केल्यानंतर दत्तात्रय गुरव यांनी पुर्वापार असलेला नाल्याचा प्रवाह बदलला होता. सदर बाबीवरून फिर्यादी व आरोपी यांच्यात वाद होवून प्रस्तुतची तक्रार दाखल झालेली आहे. साक्षीदार क्रं. २ नाथा वाळवेकर हे घटनास्थळ पंच असून त्यांना घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता आल्या नाहीत. त्याचबरोबर गट नं. ४८५ चा ७/१२ उतारा तसेच गाव/गट नकाशा पाहिलेला नाही. त्यांचे दत्तात्रय गुरव व सर्जेराव पाटील यांच्यासोबत चांगले संबंध नाहीत. साक्षीदार क्रं. ३ अमोल आनंदा तेली नि.क्रं. ८३ व साक्षीदार क्रं. ४ विमल कृष्णात पाटील नि.क्रं. ८४ या साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहायय केले नसल्याने त्यांची साक्ष निरूपयोगी ठरलेली आहे. साक्षीदार क्रं. ५ दत्तात्रय वाळवेकर, साक्षीदार क्रं. ६ अमित पाटील यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, रेवटा याठिकाणी राजाराम कांबळे यांची शेतजमीन नाही. त्यांच्या समक्ष कोणालाही मारहाण झालेली नाही. तसेच दत्तात्रय गुरव व संजय गुरव यांच्यात काय भांडणे याविषयी देखील त्यांना माहित नाही.

२३. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं.७ मनाली माने यांनी त्यांच्या उलटतपासात पोलीसांच्या विनंतीवरून त्यांनी जखमींना तपासले. जखमांचे वर्णन त्यांना सांगता आलेले नाही. केवळ वरिष्ठांच्या आदेशान्वये प्रस्तुत गुन्हयातील जखमींची एम.एल.सी. इश्यु केली. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ८ सर्जेराव ज्ञानू पाटील नि.क्रं. ९३ प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल हा त्यांनी आरोपीकडून जमा करून घेतलेला आहे. जखमीच्या रक्तांचे नमुने घेतले नाहीत व तपासकामी सी.ए. रिपोर्ट मिळण्याकरीता पाठविले नाहीत अशी तांत्रिक व औपचारीक स्वरूपाची साक्ष

नोंदविली आहे. प्रस्तुत प्रकरणातील बांबुच्या काठया एकुण ७ या उपयुक्त नसल्याने त्या नाश करणे योग्य होईल. या सर्व बाबींचा विचार करता अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणात स्वतंत्र व प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदवलेली नाही. तसेच घटनास्थळ पंचनामा तसेच जप्ती पंचनामा सक्तरित्या शाबित केलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये अभियोगपक्षाचा पुरावा हा आरोपींनी त्यांचेवर दोषारोपीत केलेला गुन्हा केला आहे हे सिध्द होण्यास पुरेसा नाही किंबहुना सुसंगत नाही. अभियोगपक्षाने कायद्याप्रमाणे फिर्यादीचे संपुर्ण कथन संशयापलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व कारणांमूळे हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादी यांना जिवे मारण्याची धमकी देवुन फौजदारी पात्र अपराध केल्याचे संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्याचा फायदा निश्चितच आरोपींच्या पक्षात जातो सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **प्रश्नबिंदू क्रं.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.**

**प्रश्नबिंदू क्र.६ करीताः**

**२४.** प्रश्नबिंदू क्र.१ ते ५ च्या उत्तरानुसार अभियोगपक्षाद्वारे भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,१४८,३२४,५०४ सह कलम १४९ प्रमाणे आरोपींवर असलेले आरोप सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ व विश्वासार्ह साक्षी पुरावा प्रस्तुत प्रकरणात आलेला नसल्यामुळे सर्व आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल एकुण आठ काठया या आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने त्यांचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे न्यायोचित होईल. सबब, प्रश्नबिंदू क्र.६ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

**आदेश**

१. आरोपी क्र.१ संजय बापु गुरव, आरोपी क्र.२ सुरेश बापु गुरव, आरोपी क्रं.३ बापु कृष्णा गुरव, आरोपी क्र.४ पांडुरंग कृष्णा गुरव, आरोपी क्रं.५ वसंत बळवंत गुरव, आरोपी क्रं.६ बळवंत कृष्णा गुरव, आरोपी

क्रं.७ उत्तम धोंडीराम गुरव, आरोपी क्रं.९ संगिता संजय गुरव सर्व रा. पाटपन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर, यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०४ सह कलम १४९ प्रमाणे चे गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत.

२. आरोपी क्रं.८ ही हिराबाई बापु गुरव ही मयत झाली असून तिच्यासाठी सदरचा दावा हा अवसान पावला.

३. आरोपींची वैयक्तीक व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

४. आरोपी क्रं.१ ते ७ व ९ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रु.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जामीन दयावा.

५. जप्त एकुण आठ काठया या आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने तिचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by Vaishali Amol Lavand-Kokate
Date: 2026.05.12 18:15:08 +0530

(व्ही.ए.लावंड-कोकाटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे-खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

दिनांक -१२.०५.२०२६.
कळे-खेरीवडे.